## मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम – परिवहन अभियांत्रिकी विभाग – तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, वडाळा

### व्यवसाय प्रशिक्षणार्थी पदाकरिता कागदपत्रे तपासणी व मुलाखतीचा कार्यक्रम

अ) उमेदवारांना कळविण्यात येते की मुलाखतीच्या कार्यक्रमास येताना खाली दर्शविलेली कागदपत्रे तपासणीसाठी आपल्या सोबत आणावीत

(१) सर्व मूळ शैक्षणिक कागदपत्रे (शाळा सोडल्याचा मूळ दाखला, शालांत परीक्षा प्रमाणपत्र (एस एस सी, आय टी आय, एच एस सी - एम सी व्ही सी अथवा एम एस बी एस व्ही इ टी जे लागू असेल ते), जातीचे प्रमाणपत्र, माजी सैनिकाचा पाल्य असल्यास त्या बाबतचा पुरावा, विकलांग उमेदवारांच्याबाबतीत वैद्यकीय प्रमाणपत्र व सेवा योजन कार्यालयाकडे केलेल्या नोंदीची प्रत, आय टी आय उत्तीर्ण उमेदवारांनी **www.apprenticeshipindia.gov.in** या साईट वर नोंदणी केलेल्या व "A" क्रमांक मिळविलेल्या नोंदीची प्रत.

(२) दोन पासपोर्ट आकाराचे फोटोग्राफ,

(३) वैद्यकीय तपासणी करीता रक्कम रुपये ५००/- फक्त.

(४) आधार कार्ड.

(५) ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रत व पोच पावती तथा प्रवेश पत्राची प्रत.

आ) मुलाखतीच्या कार्यक्रमात उमेदवारांच्या नावासमोर मुलाखतीची तारीख व वेळ दर्शविली आहे. त्या नुसार उमेदवारांनी दिलेल्या तारखेला व वेळेवर तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, वडाळा, पहिला मजला येथे उपस्थित राहणे आवश्यक आहे. जे उमेदवार नमूद केलेल्या तारखेस/वेळेस हजर राहणार नाहीत त्यांना बेस्ट उपक्रमात प्रशिक्षणार्थी पदाकरीता स्वारस्य नाही असे समजून प्रतीक्षायादीवरील उमेदवारांचा या पदा करीता विचार केला जाईल याची नोंद घ्यावी. उपरोक्त मुलाखतीचा कार्यक्रम व सूचना उमेदवरांना त्यांच्या वैयक्तिक ई मेल / मोबाइल एस एम एस द्वारे देखील प्राप्त होतील.

इ) नमूद केलेल्या मुलाखतीच्या कार्यक्रमा नंतर रिकाम्या राहिलेल्या जागांकरिता प्रतीक्षा यादीमधील उमेदवारांचा विचार केला जाईल. या संदर्भात प्रतीक्षा यादीमधील उमेदवारांना पुढील सुचना संबंधित यादीच्या तळाशी दर्शविली आहे.

ई) प्रतीक्षायादीतील आय.टी.आय. तारतंत्रीच्या उमेदवारांना "**तारखंड जोडणीदार**" या पदाकरीता स्वारस्य असल्यास त्यांनी तांत्रिक प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधावा.